जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 DEC 2025 पुढारी

# 'आजीबाईंची शाळा' उपक्रम समाजाला नवी दिशा देणारा

## प्र. कुलगुरू डॉ. जाधव; माने शिक्षण समूहाच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये कार्यक्रम



पेठवडगाव : येथील बी.एड. कॉलेजमध्ये 'आजीबाईंची शाळा' या उपक्रमाचे उद्घाटन प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी विजयसिंह माने, डॉ. राहुल माने, डॉ. रामचंद्र पवार, श्वेता निर्मळे-चौगुले उपस्थित होते.

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

दोन पिढ्यांमधील संवाद वाढवून आनंदी जीवनाचा संदेश देत त्याची कृतिशील अंमलबजावणी करणारा 'आजीबाईंची शाळा' हा उपक्रम समाजाला नवी दिशा देणारा आहे. या उपक्रमातून संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत होऊन पारंपरिक ज्ञान, माहिती यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

पेठवडगाव येथील माने शिक्षण समूहाच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे 'आजीबाईंची शाळा' हा उपक्रम सुरू करण्यात आला. याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विजयसिंह माने होते. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार व बी. एड. कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे.

विजयसिंह माने म्हणाले, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात बी.एड. कॉलेज अग्रभागी आहे. संवाद हा माहिती मिळविण्याचा प्रमुख मार्ग आहे. आजीबाईंकडून मौलिक मार्गदर्शन मिळून जीवनातील कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. तसेच मूलभूत, डिजिटल व आर्थिक साक्षरता वाढून महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न गतिमान होण्यास हा उपक्रम उपयोगी आहे.

प्राचार्या डॉ. श्वेता निर्मळे चौगुले म्हणाल्या, या उपक्रमाची संकल्पना राबविणारे एकमेव महाविद्यालय असून, महिनाभर उपक्रम राबवून याची पुस्तिका तयार केली जाणार आहे. जागतिक पातळीवर या उपक्रमाची दखल घेतली जाईल.

यावेळी डॉ. राहुल माने, डॉ. रामचंद्र पवार, माधुरी जाधव, शर्वरी करपे यांची भाषणे झाली. प्रा. एस. के. सोरटे, प्रा. ए. पी. सावंत, प्रा. व्ही. डी. चव्हाण, प्रा. टी. पी. दराडे, प्रा. आर. आर. चव्हाण, एस. एस. चौगुले उपस्थित होते. प्रगती चौगुले, अभिजित सावंत यांनी सूत्रसंचालन केले.

16 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात घरापासून व्हावी

## के. मंजूलक्ष्मी; महाराणी ताराराणी यांच्या कार्याचा विद्यापीठात जागर

कोल्हापूर : प्रतिनिधी

स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात घरापासून झाली, तरच समाजात समानतेचे बीज रुजेल. त्या दृष्टीने महाराणी ताराराणी यांचे जीवनचरित्र स्त्रियांच्या कर्तृत्वासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन महापालिकेच्या प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांनी सोमवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि बेटी बचाव अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात करवीर राज्य संस्थापिका छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त 'महाराणी ताराराणी यांच्या शिवशाहीचा तेजस्वी जागर' या उपक्रमांतर्गत व्याख्यान, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार आणि मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव होत्या.

मंजूलक्ष्मी म्हणाल्या, एकीकडे शिक्षणामध्ये मुलींचा टक्का खूप मोठा आणि वाढता आहे. त्याचवेळी विविध खासगी, शासकीय आस्थापना



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आयुक्त तथा प्रशासक के. मंजूलक्ष्मी.

आणि सेवांमध्ये मात्र त्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी आहे. ही तफावत दूर करण्याची गरज आहे. कुटुंबातील प्रत्येकाने घरामध्ये मुलगा-मुलगी असा भेद न करता दोघांचेही समान पद्धतीने संगोपन करणे आवश्यक आहे.

पेठवडगावच्या बी.एड. कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य श्वेता चौगुले म्हणाल्या, ताराराणी या केवळ लढवय्या नव्हत्या, तर त्या एक आदर्श सून, पत्नी आणि माताही होत्या. गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी इच्छाशक्ती, कष्ट करण्याची तयारी आणि त्यामध्ये सातत्य यांच्या जोडीला कुटुंबीयांचे पाठबळ ही बाब सुद्धा महिलेच्या प्रगतीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, महाराणी ताराराणी खऱ्या अर्थाने स्वराज्य रक्षक होत्या. इथल्या प्रत्येक मुलीने त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, लहानपणापासून महाराणी ताराराणी यांचा पुतळा माझे प्रेरणास्त्रोत राहिला आहे. या पुतळ्यासमोर नतमस्तक होताना कृतज्ञतेमुळे डोळ्यांतून अश्रू ओघळल्याशिवाय राहात नाहीत.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, पुराभिलेख अधिकारी दीपाली पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले, तर डॉ. सुषमा पाटील यांनी आभार मानले.

दुसऱ्या सत्रात व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. मंजिरी मोरे, अधिसभा सदस्य श्वेता परुळेकर, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. विनिता रानडे, ॲड. अनुष्का कदम, दुर्गाली गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

16 DEC 2025 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात घरापासून व्हावी

## महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

स्त्री-पुरूष समानतेची सुरुवात घरापासून झाली, तरच समाजात समानतेचे बीज रुजेल. त्या दृष्टीने महाराणी ताराराणी यांचे जीवनचरित्र स्त्रियांच्या कर्तृत्वासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि बेटी बचाव अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात करवीर राज्य संस्थापिका छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त 'महाराणी ताराराणी यांच्या शिवशाहीचा तेजस्वी जागर' या उपक्रमांतर्गत व्याख्यान, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार आणि



मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

पेठवडगावच्या बी. एड. कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य श्वेता चौगुले म्हणाल्या, ताराराणी या केवळ लढवय्या होत्याच. पण त्या एक आदर्श सून, पत्नी आणि

> शिक्षणामध्ये मुलींचा टक्का खूप मोठा आणि वाढता आहे. त्याच वेळी विविध खासगी, शासकीय आस्थापना आणि सेवांमध्ये मात्र त्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी आहे. कुटुंबातील प्रत्येकाने मुलगा-मुलगीचे समान पद्धतीने संगोपन करणे आवश्यक आहे. तरच त्यांच्या मनावर लहानपणापासून समानतेचे मूल्य रुजेल.
>
> - आयुक्त के. मंजुलक्ष्मी

माताही होत्या. गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड म्हणाल्या, मी कष्टकरी घरात जन्मला येऊनही घरच्यांच्या पाठिंब्यावर शिक्षण घेतले. एकोणीसाव्या वर्षी विवाह झाल्यानंतर सासरच्यांच्या पाठिंब्यावर राज्यसेवा आणि केंद्रीय सेवा परीक्षा पहिल्याच प्रयत्नांत उत्तीर्ण झाले. इच्छाशक्ती, कष्ट करण्याची तयारी, सातत्य आणि कुटुंबीयांचे पाठबळ असेल तर महिला प्रगती करू शकतात. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, महाराणी ताराराणी यांचे कर्तृत्व केवळ करवीरपुरते मर्यादित नव्हते. तर त्या खऱ्या अर्थाने स्वराज्य रक्षक होत्या. इथल्या प्रत्येक मुलीने त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्षीय स्थानावरून प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, लहानपणापासून महाराणी ताराराणी यांचा पुतळा माझे प्रेरणास्रोत राहिला आहे. या पुतळ्यासमोर नतमस्तक होताना कृतज्ञतेमुळे डोळ्यांतून अश्रू ओघळल्याशिवाय राहात नाहीत. त्या प्रजाहितदक्ष रणरागिणी होत्याच, त्याच बरोबरीने कुशल प्रशासक व राजकारणी होत्या.

वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, पुराभिलेख अधिकारी दीपाली पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. डॉ. सुषमा पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. मंजिरी मोरे, अधिसभा सदस्य श्वेता परुळेकर, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. विनिता रानडे, ॲड. अनुष्का कदम, दुर्गाली गायकवाड आदी उपस्थित होते.

16 DEC 2025

तरुण भारत

# 'स्त्री-पुरूष समानतेची सुरुवात घरापासून व्हावी'

**कोल्हापूर :** समाजात समानतेचे बीज रुजण्यासाठी स्त्री-पुरूष समानतेची सुरुवात घरापासून होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने महाराणी ताराराणी यांचे जीवनचरित्र स्त्रियांच्या कर्तृत्वासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन महापालिकेच्या प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि बेटी बचाव अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित 'महाराणी ताराराणी यांच्या शिवशाहीचा तेजस्वी जागर" या उपक्रमांतर्गत व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. यावेळी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार व मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

के. मंजुलक्ष्मी म्हणाल्या, एकीकडे शिक्षणामध्ये मुलींचा टक्का खूप मोठा आणि वाढता आहे. त्याच वेळी विविध खासगी, शासकीय आस्थापना आणि सेवांमध्ये मात्र त्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी आहे. ही तफावत दूर करण्याची गरज आहे. कुटुंबातील प्रत्येकाने घरामध्ये मुलगा-मुलगी असा भेद न करता दोघांचेही समान पद्धतीने संगोपन करणे आवश्यक आहे. प्राचार्य श्वेता चौगुले म्हणाल्या, ताराराणी या

16 DEC 2025
पुण्यनगरी

# शिक्षणशास्त्र अधिविभागात कार्यशाळेस सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात 'स्टेम' अध्यापनशास्त्र 'इनोव्हेटिव्ह स्टेम पेडागॉजी : ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेस सोमवारी सुरुवात झाली. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. प्रमुख पाहुणे आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी, स्टेम अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून गरजेची बाब आहे, असे सांगितले.

अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे होत्या. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव उपस्थित होते.

16 DEC 2025

जनप्रवास

# शिक्षणशास्त्र अधिविभागात कार्यशाळेचे उदघाटन

कोल्हापूर : प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाता 'स्टेम' अध्यापनशास्त्र "इनोवेटीव स्टेम पेडागॉजी : ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी म्हणाले, स्टेम (STEM) अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून गरजेची बाब आहे. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे होत्या. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव उपस्थित होते.

16 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन



**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात 'स्टेम' अध्यापनशास्त्र ''इनोवेटीव स्टेम पेडागॉजी :ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आज उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले, ''स्टेम (STEM) अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून गरजेची बाब आहे. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे होत्या.

समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव उपस्थित होते. विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राध्यापक यांनी कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या १५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील सोमवारी २४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले असून आजअखेर १५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. सोमवारी ७० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध १८० केंद्रावर परीक्षा पार पडली असून सदर परीक्षांसाठी १० हजार ९८६ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून सोमवारी कोल्हापूर १, सांगली ३ व सातारा २ अशा एकूण ६ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

16 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे १५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील सोमवारअखेर १५१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीए., बीएस्सी, एमए., एमएसडब्ल्यू, एमएस्सी., बी.फार्मसी, बी.टेक., बॅचलर ऑफ लॉ, एमसीए आदी ७० अभ्यासक्रमांच्या परीक्षा १८० केंद्रांवर झाल्या. दि. १५ रोजी बीआयडी, एमएस्सी. (जिओ इन्फॉर्मेटिक्स), एमएस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स), बीसीए., एजीपीएम आदी २७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. भरारी पथकाने सहा गैरप्रकारांची नोंद केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2025
तरुण भारत

# भाऊ पाध्ये मराठीतील अनुभववादी लेखक

## प्रा. अविनाश सप्रे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भाऊ पाध्ये हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे अनुभववादी, मानवतावादी लेखक होते. समस्त प्रस्थापित मांडणी, प्रस्थापित चौकटी झुगारून जगण्याचे अराजक मांडणारे लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक व समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे पी.एम.–उषा योजनेअंतर्गत साठोत्तरी काळातील अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मयः आकलन आणि पुनर्विचार" या विषयावरील दोनदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते. अनुवादक व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

मान्यवरांच्या हस्ते भाऊ पाध्ये यांच्या 'राडा' या गोरख थोरात अनुवादित हिंदी कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. थोरात यांच्यासह दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवड झाल्याबद्दल प्रा. सप्रे यांचा आणि उत्कृष्ट शोधप्रबंध पुरस्कार प्राप्त करणारे डॉ. राजेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना प्रा. अविनाश सप्रे.**

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. माया पंडित, डॉ. उदय नारकर, डॉ. श्रीराम पवार, सचिन परब, डॉ. शरद नावरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. किरण गुरव, प्रसाद कुमठेकर आदी उपस्थित होते.

**'वाचकांची अभिरुची घडविणारा पत्रकार, लेखक"**

लघुनियतकालिक चळवळीला बळ देणारा प्रणेता भाऊ पाध्ये होते. कामगार चळवळीत त्यांचे संपूर्ण आयुष्य गेले. त्यामुळे येथील अधोसंस्कृतीकडे पाहण्याची त्यांची म्हणून एक वेगळी दृष्टी होती. सिनेमापासून राजकारणापर्यंत विविध विषय त्यांनी पत्रकार, लेखक म्हणून हाताळले. त्यांनी वाचकांची अभिरुची घडविली. नवे लेखक त्यांच्या लेखन, शैलीपासून प्रेरणा घेत आहेत, ही समाधानाची बाब असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

1 6 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लॅब टू फॅब्रिकेशन संशोधनाला उद्योगाची जोड द्यावी

**जनप्रवास : कोल्हापूर**

केवळ प्रयोगशाळेतील चार भिंतींच्या आत संशोधन करून थांबणे उपयोगाचे नसून संशोधनाचे रुपांतर प्रत्यक्ष उत्पादनात आणि व्यापारात झाले पाहिजे. देशाला खऱ्या अर्थाने स्वावलंबी आणि विकसित बनवण्यासाठी 'ॲकॅडेमिया आणि इंडस्ट्री' यांच्यात थेट संवाद होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या तरुल इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सिनेट

**• पुण्याच्या तरुल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते यांचे प्रतिपादन**

हॉलमध्ये या आंतरराष्ट्रीय परिषदेची मोठ्या उत्साहात सांगता झाली. समारोप अध्यक्षस्थानी प्रा. राजेंद्र सोनकवडे होते.

भारताला ॲल्युमिनियम कास्टिंग आणि फॅब्रिकेशन क्षेत्रात जागतिक स्तरावर नेवून ठेवणाऱ्या भरत गीते यांनी विद्यार्थ्यांनी संशोधनाचे रुपांतर उद्योगात कसे करावे. दक्षिण अमेरिकेतील चिली येथील डॉ. संतोष नंदी यांनी नॅनो स्ट्रक्चर्समधील अद्ययावत बदलांची माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. मानसिंग टाकळे होते.

अध्यक्षस्थानावरून डॉ. सोनकवडे म्हणाले, भौतिकशास्त्र अधिविभाग नेहमीच अशा जागतिक दर्जाच्या उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन देत आला आहे. यातूनच उद्याचे शास्त्रज्ञ घडणार आहेत. आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. नानासाहेब थोरात उपस्थित होते.

समन्वयक डॉ. नीलेश तरवाळ यांनी तीन दिवसांच्या कामकाजाचा आढावा सादर केला. डॉ. सत्यजित पाटील यांनी आभार मानले. परिषदेच्या यशस्वितेसाठी खजिनदार डॉ. राजीव व्हटकर, सचिव डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. केशव राजपुरे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. एम. आर. वाईकर, डॉ. ए. आर. पाटील आदी उपस्थित होते.

16 DEC 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. राजेश पाटील यांना करंदीकर संशोधन पारितोषिक

**कुडुत्री : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या वतीने मराठी विषयातील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधाला देण्यात येणारे डॉ. व्ही. आर. करंदीकर संशोधन पारितोषिक डॉ. राजेश हिंदुराव पाटील (सोन्याची शिरोली) यांना जाहीर झाले आहे. डॉ. करंदीकर सत्कार समिती, पुणे यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून हे पारितोषिक दिले जाते. सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील सर्वोत्कृष्ट



प्रबंध म्हणून विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधाला हे पारितोषिक जाहीर केले.

डॉ. राजेश पाटील यांना 'कृष्णराव अर्जुन केळुसकर : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावरील प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. प्रा. डॉ. राजन गवस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले आहे. या संशोधन कार्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून विशेष संशोधन शिष्यवृत्ती त्यांना प्राप्त झाली होती. पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. याकामी त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. रणधीर शिंदे, प्रा. नंदकुमार मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

1 6 DEC 2025

लोकमत

# क्विक Update

## पाटील यांना 'करंदीकर संशोधन' पारितोषिक

**राधानगरी :** शिवाजी विद्यापीठ



यांच्यावतीने मराठी विषयातील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधाला देण्यात येणारे डॉ. व्ही. आर. करंदीकर संशोधन पारितोषिक डॉ. राजेश पाटील (सोन्याची शिरोली, ता. राधानगरी) यांना जाहीर झाले. सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील सर्वोत्कृष्ट प्रबंध म्हणून विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधाला हे पारितोषिक जाहीर केले. डॉ. पाटील यांना 'कृष्णराव अर्जुन केळूसकर : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावरील प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

16 DEC 2025

तरुण भारत

# डॉ. पाटील यांच्या प्रबंधाला पारितोषिक जाहीर

**शिरगाव :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यावतीने मराठी विषयातील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधाला देण्यात येणारे डॉ. व्ही. आर. करंदीकर संशोधन पारितोषिक राधानगरी तालुक्यातील सोन्याची शिरोली येथील डॉ. राजेश पाटील यांना जाहीर करण्यात आले. सन १९७९ पासून डॉ. करंदीकर सत्कार समिती, पुणे यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून दर दोन वर्षांच्या कालावधीत शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधाला हे पारितोषिक देण्यात येते. सन २०२३ ते २०२५ या कालावधीतीत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात सादर झालेल्या प्रबंधातून निवड समितीने डॉ. पाटील यांच्या प्रबंधाला हे पारितोषिक जाहीर केले.

जनसंपर्क कक्ष

1 6 DEC 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूलने पटकावला यसबा करंडक

कोल्हापूर, ता. १५ : ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या सातव्या स्मृती दिनानिमित्त नुकताच यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव झाला. महोत्सवात वसंतराव चौगुले इंग्लीश मीडियम स्कूलने विजेतेपद पटकावले, तर विमल गोयंका इंग्लिश मिडीयम स्कूलने उपविजेतेपद पटकावले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग, चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशन यांच्या वतीने हा कला महोत्सव झाला. महोत्सवात निबंध लेखन, माती काम, चित्रकला, रांगोळी, एकपात्री अभियन, समुहगीत, समुह नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात १६ शाळेच्या ३४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



कोल्हापूर : यसबा करंडकासह वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूलचे कलाकार.

उद्योजक संग्राम पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घघाटन झाले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक टी. ए. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

यावेळी प्रा. प्रज्ञा गिरी व आशिष घेवडे यांना यसबा बालमित्र पुरस्कार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला. रेश्मा चिले, अंजली पाटील, नंदु जुवेकर, संजय तोडकर, डॉ. किशू पॉल, सुचित्रा मर्ढेकर, सुधीर जोशी, सत्यजीत निगवेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहीले या फौंडेशनचे अध्यक्ष संदिप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव, संग्राम भालकर, समन्वयक शिवम गेजगे, आकाश लिगाडे, रमा कुलकर्णी, प्रविण काटकर, सपना चव्हाण, मैथिली सरनाईक यांनी संयोजन केले.

16 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## ६२ वा दीक्षांत समारंभ अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ बुधवार, दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजी संपन्न होत आहे.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरिता नजिकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळ (www.unishivaji.ac.in) आणि दैनिकांमधून प्रसिध्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. १६ डिसेंबर, २०२५

16 DEC 2025

पुढारी

Estd. 1962
"A++" *Accredited by*
NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६२ वा दीक्षांत समारंभ अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न होत आहे.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरिता नजीकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळ **(www.unishivaji.ac.in)** आणि दैनिकांमधून प्रसिद्ध करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**दीक्षांत विभाग**
**दि. १६ डिसेंबर २०२५**

16 DEC 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd.1962
"A++" Accredited
by NAAC (2021)
with CGPA 3.52

## ६२ वा दीक्षांत समारंभ अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ **बुधवार, दि.२४ डिसेंबर, २०२५ रोजी** संपन्न होत आहे.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरिता नजिकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळ **(www.unishivaji.ac.in)** आणि दैनिकांमधून प्रसिद्ध करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**दीक्षांत विभाग :**
**दि. १६ डिसेंबर, २०२५**

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ